स्वच्छ गांव ! निर्मल ग्राम !! सुंदर गांव !!!



गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)



पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपुर.

सरपंच
श्री. सचिन कृष्णराव इंगळे

उपसरपंच
श्री. प्रभाकर बापुराव काळबांडे

सचिव
श्री. सी.पि. मुंगले

सदस्य गण

श्री. आकाश ज्ञानेश्वर पिसार

❖

सौ. सोनाली सतिश सेलकर

❖

सौ. कविता पिंटु ठाकरे

❖

सौ. शालिनी राजू थुल

❖

सौ. माधुरी पुरुषोत्तम बोधनकर

❖

सौ. प्रियंका छत्रपाल पाटील

जा. क्रमा. पं. वेळा (हरिश्चंद्र)
आ./जा. 963
दिनांक दि. 16/12/2020
पं.स.त.जि. नागपूर

प्रती,

श्री देवेश चंद्रकांत वाघमारे
रा. फ्लॅट नं. ४०१
रॉयल विस्ता अपार्टमेंट, धंतोली,
धंतोली गार्डन जवळ नागपूर

विषय: मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ (भाग) मधील मंजूर रहिवासी ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ: १) श्री देवेश चंद्रकांत वाघमारे यांचा दिनांक १५/१०/२०२० रोजीचा अर्ज.
२) मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो) विभाग सदर नागपुर व मा. विभागीय अधिकारी (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ग्रा. पं. चे पत्र जा. क्र १५३ दिनांक २५/११/२०२० अन्वये.
३) मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि./ ना.म.प्र.वि.प्रा. / ६६५ दिनांक १४/१२/२०२० अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि./ ना.म.प्र. वि.प्रा./६६५ दिनांक १४/१२/२०२० रोजीचे पत्रानुसार मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ (भाग) आराजी १३६५०.००चौ. मीटर (१.३६५ हे.आर) क्षेत्रफळात श्री देवेश चंद्रकांत वाघमारे यांनी अभिन्यासातील विकास करारनामा मधील अट क्र. १७,A,B,C,D,E,F नुसार विकासकाने रस्त्याचे खडीकरण, मलवाहिका, पर्जन्यवाहिका, कॉक्रीट रोड , पिण्याचे पाण्याचे वाहिनी, मल जल शुद्धीकरण संयंत्रचे मोकळ्या जागेस संरक्षण भिंतीचे काम पूर्ण केलेले आहे असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. विभागीय कार्यालय-१ दक्षिण यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करून देण्याची जबाबदारी अर्जदार / ले आऊट मालकाची राहील. जोपर्यंत प्लॉटधारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकांनांच यासमोर टॅक्स भरणा करावा लागेल. व भविष्यात सर्व प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार / ले आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही.

वरील अटी व शर्तींच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ग्राम पंचायत सदर लेआऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर.

सरपंच
गट ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र)

दिनांक : १६/१२/२०२०

प्रोसीडिंग बुक (कारवाई बुक)

ग्रामपंचायत – वेळा (हरिश्चंद्र) तहसील – नागपूर जिल्हा – नागपूर सन २०२०-२१

ग्रा.पं. वेळा (हरिश्चंद्र)
ग.प./जा.१६२
दि. १६/१२/२०२०
पं.स. व जि. नागपूर

नंबर सभेच्या दिनांक व तारीख	हजर सभा.सदांची नावे	ठरावाच्या मसुदा	सूचक / अनुमोदन	थोडक्यात चर्चा	तर्फेची संख्या व सही	विरोध कांची संख्या व सही	तटस्था ची संख्या व सही	ठराव पास किंवा नापास	सचिवा चे मत	अधिका ऱ्यांची सही
११/०६ १५/१२/२०२०	श्री सचिन कृष्णराव इंगळे सरपंच व हजेरी रजिस्टर प्रमाणे उपस्थित ग्रा.पं.सदस्य	ठराव क्र. ११ येणाऱ्या अर्जावर विचार विनिमय करणे.		मासिक सभा दिनांक - १५/१२/२०२० वेळ - सकाळी ११.०० वाजता ठराव क्र. ११/०६ : मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ भाग मधील मंजूर रहिवास्याचे अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज व मा.सहायक अभियंता -१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्राचे अनुषंगाने. **खुलासा** :- वरील विषयानुसार आजच्या सभेत श्री देवेश चंद्रकांत वाघमारे यांचा अर्ज प्राप्त झाला असून यांचा अर्जात नमूद मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ भाग ले आउट मधील मंजूर रहिवासी अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज प्राप्त झाला असून सदर अर्जाचे अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता (मेट्रो) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर नागपुर तसेच विभागीय अधिकारी (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हनुमान नगर झोन नागपूर यांना मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ भाग या ले आऊट मधील आपल्या सोबत केलेल्या करारनामा क्र. E.E.I/NMRDA/१३१दिनांक २३/०५/२०१९ नुसार केलेल्या करारनामा प्रमाणे सुविधा पूर्ण झाले की कसे याबाबत अभिप्राय मागविण्याबाबत दिनांक २५/११/२०२० रोजी ग्रा.पं. ने पत्र दिले होते. व मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा.अभि./ ना.म.प्र.वि.प्रा. ६६५ दिनांक १४/१२/२०२० रोजीचे पत्राची सत्यप्रत ग्राम पंचायतला दिनांक १४/१२/२०२० रोजी श्री देवेश चंद्रकांत वाघमारे यांचे मार्फत प्राप्त झाले. सदर अर्जाचे व ना.प्र.म.वि.प्रा. यांचे पत्राचे अनुषंगाने ग्राम पंचायत मासिक सभा दिनांक १५/१२/२०२० ठराव क्र. ११/०६ अन्वये सदर						

(P.T.O)

				अर्जाचे व पत्राचे मासिक सभेमध्ये वाचन करण्यात आले. व पत्रात नमूद आहे की मौजा वेळा (हरिश्चंद्र) ख.क्र. १७९ भाग लेआउट मध्ये विकास कामे करण्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत विकास करारनामा झालेला असून विकास करारनामा मधील अट क्र. १७ A,B,C,D,E,F नुसार विकासकाने अभिन्यासातील रस्त्याचे खडीकरण, मलवाहिका, पर्जन्यवाहिका, कॉक्रीट रोड, पिण्याचे पाण्याचे वाहिनी, मल जल शुद्धीकरण संयंत्रचे, मोकळ्या जागेस संरक्षण भिंतीचे काम पूर्ण केलेले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने व सदर पत्राचे अधीन राहून ग्रा.पं.कमेटी सर्वानुमते ठरवीत आहे की वरील ले आउट हस्तांतरित करण्यास तयार असून पत्रात नमूद बाबीची व कामाची देखभाल व दुरुस्ती करण्याचे ग्रा.पं.मंजुरी प्रदान करित आहे. परंतु सहायक अभियंता -१(दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. ६६५ दिनांक १४/१२/२०२० रोजीचे पत्राचे अधीन राहून पत्रात नमूद बाबीला काम पूर्ण झाले असे मानून वरील ले आउट शासनाचे अटी व शर्ती व वरील पत्राचे अधीन राहून हस्तांतरित करण्यात यावे व कामाची देखभाल व दुरुस्ती हस्तांतरणानंतर ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करण्यात यावी ब जोपर्यंत प्लॉट धारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकांनाच टॅक्स भरणा करावा लागेल. त्यानंतरच हस्तांतरण व देखभाल दुरुस्ती ग्रा.पं. करण्यास तयार असून ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित ले आउट धारक यांची राहील असे सभेत ठरवून ठराव सर्वानुमते मंजूर. सत्यप्रत सरपंच सचिव ग्रा. ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)	--	--	--	पास	--	

ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र)
आ/जा
दि.